K. S. Wani Memorial Trust
# NEWS LETTER
Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.27 / October – December 2024 / K. S. Wani Memorial Trust Reg.(No.E352)

## Printing Institute News




### विद्यार्थ्यांची यशोगाथा

मी गोकुळ नानाभाऊ देसले मूळचा माळीच, तालुका शिंदखेडा जिल्हा धुळे येथील रहिवासी. मी २०११ साली कला शाखेतून इयत्ता बारावीची परीक्षा पास झालो. माझे आई-वडील शेतात काम करत व आपला उदरनिर्वाह चालवत. आम्ही तीन भावंडे माझ्या पेक्षा मोठ्या भावाचे धुळे येथे शिक्षण सुरू होते.

मला पुढे महाविद्यालयीन उच्चशिक्षण देण्यास आई वडिलांनी असमर्थता दर्शवली. मला लवकर रोजगार प्राप्त व्हावा व मी कुटुंबाला आधार द्यावा यासाठी मला वडिलांनी समजावून सांगितले परंतु फक्त बारावी होऊन काय काम मिळणार? मी थोडासा नाराज होतो परंतु माझ्या मोठ्या भावाने मला मुद्रण शिक्षण पदविका अभ्यासक्रम करण्याचा सल्ला दिला. माझा मोठा भाऊ एका इंक कंपनीत नोकरीस होता, त्याला या क्षेत्राविषयी विस्तृत माहिती होती. मी या क्षेत्रात करियर करावे , या क्षेत्राला भविष्यात चांगली मागणी असल्याचे त्याने मला व माझ्या वडिलांना सांगितले. भावाने मला का.स.वाणी संस्थेतील पदविका अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली व मी प्रवेश घेण्याचे निश्चित केले. मी २०१३ साली हा अभ्यासक्रम पूर्ण केला. मला सुरवातीस खोपोली येथील पॉझिटिव्ह पॅकेजिंग या कंपनीत जॉब मिळाला. माझ्या आई-वडिलांना खूप आनंद झाला. पण घरची परिस्थिती बदलायची असेल तर परदेशात जाऊन काम केले पाहिजे, असा ध्यास माझ्या मनाने घेतला.

मी जॉबसाठी प्रयत्न करू लागलो मला माझ्या भावाच्या मार्गदर्शनाने एक संधी चालून आली. मला २०१६ च्या जानेवारी महिन्यात इंटिग्रेटेड प्लास्टिक पॅकेजिंग या दुबई येथील ग्रुप मध्ये सुमारे ९ लक्ष रुपयांच्या वार्षिक पॅकेजवर नोकरी मिळाली. माझे परदेशात काम करण्याचे स्वप्न पूर्ण झाले. मी सुमारे तीन वर्षे दुबईत वास्तव्यास होतो. आज मी भारतातील राजस्थान राज्यातील भीलवाडा येथील बहुराष्ट्रीय सीगवर्क इंक कंपनीत टेक्निकल सर्विसेस या पदावर गुजरात लोकेशन साठी काम करत आहे . माझे सध्याचे वेतन प्रतिवर्ष सुमारे ९.५ लक्ष रुपये आहे. मी गेल्या सहा वर्षांपासून या कंपनीत कार्यरत आहे मला संस्थेतून अतिशय मोलाची मार्गदर्शन व शिक्षण प्राप्त झाले त्याबद्दल मी संस्थेचा व सर्व शिक्षक वृंद , पदाधिकाऱ्यांचा ऋणी आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. जगन्नाथ वाणी यांनी ही संस्था सुरू केली त्यामुळे मी शिक्षण घेऊ शकलो त्यांना मी अभिवादन करतो व संस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देतो.







## अलिबाग, रायगड येथे यंदाच्या भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे आयोजन




का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे व जे. एस. एम. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने अलिबाग येथे भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे ३५ वे अधिवेशनाचे नियोजन दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. प्राज्यविद्यापंडित शरद पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने राष्ट्रस्तरीय आंतरविद्याशाखीय चर्चासत्राचे आयोजन होत आहे. चर्चासत्रात शरद पाटील यांच्या साहित्याचे विश्लेषण, तसेच शरद पाटील यांच्या राजकीय व सामाजिक भूमिकांविषयीचे चिंतन आणि चिकित्सा करण्यात येणार आहे. दोन दिवसाच्या पाच-सत्रात निबंधवाचक अभ्यासपूर्ण शोध-निबंध सादर करतील. बीजभाषण इतिहास तज्ञ व विचारवंत डॉ. उमेश बगाडे सादर करणार आहेत.

जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. गौतमभाई पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील, अधिवेशनाचे उद्घाटन आदिवासी साहित्याच्या लेखिका व विचारवंत नजूबाई गावीत यांच्या हस्ते होणार असून, भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत डॉ. यशवंत मनोहर, प्रा.डॉ.के.बी. पाटील, स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सीए. श्री. शशिकांत धामणे, सचिव, विश्वस्त प्रा. डॉ. शोभा शिंदे आणि संचालक प्रा.डॉ.वंदना महाजन यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

अधिवेशनात डॉ. भारत पाटणकर, डॉ. सुरेश जोंधळे, डॉ.सुधाकर गायकवाड, डॉ. लता प्रतिभा मधुकर, डॉ. मृदुल निळे हे चर्चासत्राचे सत्राध्यक्ष म्हणून भूमिका बजावनावर असून, डॉ. श्रीनिवास हेमाडे, डॉ. राहुल कोसंबी, डॉ. देवेंद्र इंगळे, डॉ. जयकुमार कांबळे, डॉ. सचिन गरुड, डॉ. धम्मसंगिनी रमा गोरख, डॉ. संध्या नरे पवार, डॉ. अनिल सपकाळ, डॉ. राजेंद्र गोराणकर, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. किशोर ढमाळे, डॉ. नारायण भोसले, डॉ.मिनल जगताप यांचे अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर होणार आहेत. समारोप समारंभ दिल्ली येथील जवाहर नेहरू विद्यापीठाचे निवृत्त प्रा. डॉ. गोपाळ गुरु यांच्या अध्यक्षतेखाली आणि का.स.वाणी प्रतिष्ठानचे सचिव डॉ.शोभा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे.

महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख आणि प्राचार्य यांनी आपले प्रतिनिधी पाठवून अधिवेशनास सहभागासाठी सहकार्य करावे असे आवाहन प्रा. डॉ. वंदना महाजन व प्रा. डॉ. सोनाली पाटील यांनी केले आहे.


## ऑनलाईन कॅम्पस इंटरव्ह्यू चे दुबई येथून आयोजन

आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपनीतून जॉब मिळावा या हेतूने दरवर्षी कॅम्पस इंटरव्ह्यू चे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेमार्फत प्रथमच दुबई येथील किमोहा ग्रुप तर्फे कॅम्पस इंटरव्यू चे आयोजन करण्यात आले. किमोहा ग्रुपचे पदाधिकारी श्री चंद्रा के. यांनी ऑनलाईन इंटरव्ह्यू घेतले त्यात संस्थेतील चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून भावेश पाटील, विजय पाटील, तुषार पाटील, व राहुल पाटील या विद्यार्थ्यांचा त्यात समावेश आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरीस हे विद्यार्थी किमोहा ग्रुप मध्ये रुजू होणार आहेत. प्रतिष्ठानचे विद्यमान अध्यक्ष मा. सी.ए. श्री शशिकांत धामणे व मा. श्री राहुल नेरकर (सी.ई.ओ.) रत्ना पॅकेजिंग, बंगलोर यांनी या आयोजनात मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विश्वस्त , पदाधिकारी व कर्मचारी वृंदातर्फे अभिनंदन करण्यात आले.






## का.स.वाणी संस्थेला प्रा. डॉ.आशुतोष पाटील यांच्याकडून अमूल्य ग्रंथ साहित्याची भेट.



क.ब.चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आजीवन अध्ययन-अध्यापन विभागातील संचालक प्रा. डॉ. आशुतोष पाटील यांनी संग्रहित केलेली मराठी साहित्याची पुस्तके, नियतकालिके, मासिके व दिवाळी अंकांची अमूल्य भेट का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या ग्रंथालयाला देऊन मराठी विभागाच्या संदर्भग्रंथात मोलाची भर घातली आहे.डॉ. पाटील यांनी दिलेल्या ग्रंथसामग्री संशोधक अभ्यासकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. भेटीदाखल ग्रंथ दिल्याबद्दल संस्थेतर्फे पत्र देऊन विशेष आभार व्यक्त केले आहेत.

## जागतिक एड्स दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

कै. भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय धुळे अंतर्गत जिल्हा एड्स निर्मूलन कक्ष व का. स. वाणी संस्था व रेड रिबन क्लब धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून ११ डिसेंबर रोजी आपल्या संस्थेत आधार बहुउद्देशीय संस्था (विहान), धुळे या संस्थेचे समुपदेशक श्री दुर्गेश पाचोंदे यांनी स्व अनुभव कथनातून एड्स आजाराविषयी सविस्तर माहिती सांगून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. एड्स पॉझिटिव्ह रुग्णाला वेगळी वागणूक देऊन त्याचे मानसिक खच्चीकरण करू नका असा सल्लाही दिला. श्री पाचोंदे हे स्वतः पॉझिटिव्ह आहेत व त्यामुळे या आजाराबाबत जास्तीत जास्त काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. तसेच धुळे जिल्हा रुग्णालयाचे एड्स नियंत्रण कक्षातील समुपदेशक श्री बाबाजी पाटील यांनी देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. २०३० पर्यंत आपला देश एड्स मुक्त करण्यासाठी आपण सर्वांनी योगदान दिले पाहिजे असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर केले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण झाली.




## डॉ. वंदना महाजन यांची संमेलना अध्यक्ष म्हणून अभिनंदनीय निवड



का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या संचालिका व मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. वंदना महाजन यांची नाशिक जिल्हा प्रगतशील चौथे साहित्य संमेलनाचे संमेलना अध्यक्ष व कर्जत येथील तिसरे स्त्री शिक्षिका साहित्य संमेलनाचे संमेलना अध्यक्ष म्हणून सन्माननीय निवड झाल्याबद्दल का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या कार्यकारिणी सभेत विशेष अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला.

संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचारी यांच्यातर्फे डॉ. वंदना महाजन यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे, त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



## सीए अभिषेक धामणे यांचे हार्दिक अभिनंदन !

का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष माननीय श्री. सीए. शशिकांत धामणे यांचे चिरंजीव सीए अभिषेक धामणे यांनी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया (ICAI) च्या वेस्टर्न रिजनच्या निवडणुकीत यशस्वी विजय मिळवल्याबद्दल का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या कार्यकारीणी सभेत विशेष अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. सीए अभिषेक धामणे यांच्या निवडीबद्दल संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचारी यांनी हार्दिक अभिनंदन केले असून, त्यांच्या भविष्यातील पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# रेऊ वाणी विज्ञान विहार

## राष्ट्रीय गणित दिवस साजरा

रेऊ वाणी विज्ञान विहारा तर्फे दरवर्षी २२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय गणित दिवस साजरा केला जातो. यावर्षी ए आय आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स व गणिताचा संबंध या विषयावर माननीय प्राध्यापिका कविता बिरारी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राध्यापक अविनाश खरवंडीकर सर उपस्थित होते. तसेच या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या गणितावरती परीक्षा व प्रश्नमंजुषा घेऊन प्रथम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला बाल गणितज्ञ म्हणून प्रोत्साहनपर बक्षीस वाटप करण्यात येते. या कार्यक्रम आयोजना मागचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये गणिताची भीती जाऊन त्यांना गणित हा विषय आपलासा वाटावा व त्यात रुची निर्माण व्हावी यासाठी दर महिन्याला विविध गणितातील विषयांवर प्रयोगशाळेत मार्गदर्शनही केले जाते.




## इकोफ्रेंडली आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा

रेऊ वाणी विज्ञान विहारात पर्यावरण पूरक समिती अंतर्गत दरवर्षी दिवाळीच्या वेळेस इकोफ्रेंडली आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा घेण्यात येते. यावर्षी दिनांक 25,26,27ऑक्टोंबर 2024 रोजी विज्ञान विहारातील विद्यार्थ्यांसाठी व वनवासी कल्याण आश्रमातील मुलींसाठी आणि मराठा बोर्डिंग येथे विद्यार्थ्यांसाठी आकाश कंदील बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत एकूण 70 विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आकाश कंदील बनवला त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद बघण्यासारखा होता.




## डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा पूर्वतयारी वर्ग

रेऊ वाणी विज्ञान विहारात नियमित प्रयोग वर्गाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षांची विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेण्यात येते. यावर्षी डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धे साठी विज्ञान विहारातील सहावीतील दहा विद्यार्थ्यांनी प्रथम फेरीसाठी प्रवेश घेतला होता त्यापैकी नियमित प्रयोग वर्गातील एकूण चार विद्यार्थ्यांची द्वितीय फेरीस निवड झाली. तसेच द्वितीय फेरी म्हणजे प्रयोग फेरीसाठी धुळ्यातील व मालेगाव येथून एकूण इयत्ता सहावीचे आठ व इयत्ता नववी चे तीन विद्यार्थी आपल्याकडे प्रविष्ट झाले होते.



# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

## शारदा नेत्रालय प्रकल्पांतर्गत झालेल्या नेत्रशस्त्रक्रिया

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ धुळे तालुक्यातील ११ व अमळनेर तालुक्यातील २ शाळामध्ये २४०४ विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान २०६ विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालय येथे रेफर करण्यात आले व २५ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले.

तपासणी अहवाल तक्ता

| | ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ | ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत |
|---|---|---|
| Screened | 2404 | 119007 |
| Spect school camp | 0 | 167 |
| Refer (school) | 206 | 5210 |
| Visited | 19 | 639 |
| Surgery suggested | 0 | 56 |
| Surgery done | 0 | 38 |
| G.P. given (S.N.) | 12 | 334 |
| Higher Centre | 1 | 16 |
| Patch | 0 | 35 |
| Cornea / Retina | 0 | 11 |
| Follow up / medicine given | 0 | 119 |

## महाराष्ट्र सेवा समिती अध्यक्ष मा. श्री जीवन कायंदे यांची प्रकल्पाला भेट

महाराष्ट्र सेवा समितीचे अध्यक्ष मा. श्री जीवन कायंदे यांनी बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाला भेट देऊन महाराणा प्रताप हायस्कूल, धुळे येथे प्रकल्पाच्या कामाची पाहणी केली व प्रकल्पाबद्दल समाधान वेक्त केले .



## महाराणा प्रताप हायस्कूल येथे मा. जीवन कायंदे सरांचा स्वागत व सत्कार

महाराणा प्रताप हायस्कूल येथे मा. जीवन कायंदे सरांचा स्वागत व सत्कार मा.मुख्याध्यापक नरेंद्र उखा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मुलांशी संवाद साधताना मा.जीवन कायंदे म्हणाले की, मी सुद्धा तुमच्यासारखाच एक ग्रामीण विभागातला विद्यार्थी आहे शाळेमध्ये चटइवर बसून माझे शिक्षण झाले आहे. विद्यार्थ्यांनो तुम्हाला ज्या विषयात आवड आहे. विशेष रुची आहे त्याचे भरपूर शिक्षण घेऊन तुम्ही परदेशात नोकरी करू शकतात. आपली आवड ओळखून शिक्षण घेऊन व्यवसाय निवडला तर कामात विशेष प्राविण्य मिळवता येते व आवडीचे काम असल्यामुळे आनंदहि मिळतो. तुम्हालाही माझ्यासारखी परदेशातही नोकरीची संधी मिळू शकते त्यासाठी तुम्ही प्रयत्न करा. त्यानंतर त्यांनी आपले डोळे किती महत्त्वाचे आहे त्याची काळजी घेतली पाहिजे व ज्यांना चष्मा असेल त्यांना न चिडवता चष्मा लावण्यासाठी प्रवृत्त केलं पाहिजे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे असे सांगत त्यांनी आपल्या मार्गदर्शनाने समारोप केला.



मुख्याध्यापकांचे हस्ते सत्कार स्वीकारतांना

## वनवासी कल्याण आश्रमातील विद्यार्थ्यांना चष्मा वाटप

वनवासी कल्याण आश्रमात नेत्र तपासणी झाली होती तेथे दोन विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आले होते व एका विद्यार्थिनीला चष्मा नंबर काढून देण्यात आला होता. चष्मा असलेल्या विद्यार्थिनींना प्रकल्पा मार्फत माननीय श्री. कायंदे यांच्या हस्ते चष्मा देण्यात आला.



मोफत चष्मा वाटप करताना

## बालनेत्र सुरक्षा प्रकल्पाकडूनं दिवाळीत गरीब व गरजू मुलांना फराळ वाटप.

का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित बालनेत्र सुरक्षा प्रकल्पा तर्फे दर वर्षी आदिवासी, मागास वर्गीय व भिलाटीतील विद्यार्थ्यांना दिवाळीत फराळाचे वाटप करण्यात येते. यावर्षी पंचशील वसतीगृहातील विद्यार्थी , वनवासी कल्याण आश्रमातील व मूकबधिर संस्थेतील विद्यार्थ्यांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला.



दिवाळीचा फराळ वाटप करतांना

## बालनेत्र सुरक्षा प्रकल्पातर्फे गरजूंना ब्लँकेट वाटप.

धुळे जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात थंडीचे तापमान चार अंश सेल्सिअस पर्यंत होते त्यामुळे गरीब व गरजू रस्त्यावर भटकंती करणाऱ्या लोकांना व वृद्ध महिलांना थंडीपासून संरक्षण व्हावे या उद्देशाने ब्लँकेट वाटप करण्यात आले त्यात स्तनदा मातांचाही समावेश होता.



गरजूंना मोफत ब्लँकेट वाटप करताना

# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था पुणे व शारदा नेत्रालय

## शारदा नेत्रालयाचे २१ व्या वर्षात पदार्पण

विश्वसनीय रुग्णसेवेची २० वर्ष पूर्ण करून शारदा नेत्रालयाने २७ नोव्हेंबर २०२४ रोजी २१व्या वर्षात पदार्पण केले, ह्या अनुषंगाने शारदा नेत्रालय परिवाराने विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमात का. स. वाणी संस्थेचे अध्यक्ष मा. सी.ए. श्री शशिकांत धामणे व मा. श्री. कायंदे हे प्रमुख पाहुणे होते. तसेच संदीप फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री देवेंद्रभाई शहा व मुंबईचे इतर विश्वस्त यांची देखील उपस्थिती होती. शारदा नेत्रालयात ऑक्टोबर २०२४ पर्यंत ७,३४,००० रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी व उपचार करण्यात आले, तसेच १,१५,००० यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. डॉ. मोबाशीर अन्वर यांनी मागील २० वर्षांच्या वाटचालीची माहिती उपस्थितांना करवून दिली व कर्मचाऱ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रमुख पाहुण्यांनी शारदा नेत्रालय परिवाराचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा



कार्यक्रमात सहभागी मान्यवर व कर्मचारी

## "सा" संस्था प्रदर्शनात सहभागी

मानसिक आरोग्य सप्ताहाच्या निमित्ताने उमंग संस्थेने आयोजित केलेल्या प्रदर्शनात व कार्यक्रमात 'सा' संस्थेने सहभाग नोंदविला




## " आवाजाच्या दुनियेची सफर" कार्यक्रमाचे आयोजन

शुभार्थींना दि. ८ ऑक्टोंबर रोजी विविध NGO कडून आमंत्रित करून रेखाटन कलेची कार्यशाळा, स्टेज प्रदर्शन, आणि केदार आठवले यांच्या "आवाजाच्या दुनियेची सफर" या मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



## मानसिक आरोग्याबद्दल जनजागृती

दि. १० ऑक्टोबर रोजी मंडई आणि तुळशी बाग, पुणे येथे मानसिक आरोग्याबद्दल जनजागृतीसाठी पत्रकांचे वितरण करण्यात आले.



## "ट्रांझॅक्शनल ॲनालिसिस" कार्यशाळेचे आयोजन

दि. १६ नोव्हेंबर "ट्रांझॅक्शनल ॲनालिसिस" या विषयावर श्री. शारद सुंकर यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन



## शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

| OPD DETAILS | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Period | Paid | Review Free | Express OPD | Subsidzed | Retina OPD | Paediatric OPD | Total |
| 1st Oct'24 to 31st Dec'24 | 9763 | 3371 | 478 | 782 | 650 | 81 | **15125** |

| OT DETAILS (Surgery Details) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Period | SICS Free | SICS Paid | Phaco | Retina | Other | Paediatric | Total |
| 1st Oct'24 to 31st Dec'24 | 505 | 283 | 1142 | 47 | 695 | 2 | **2674** |

## डॉ. निशिकांत मिरजकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



तौलनिक साहित्याभ्यासाचे प्राध्यापक आणि अनुवादक डॉ. निशिकांत मिरजकर यांचे नुकतेच दुःखद निधन झाले ते का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे माजी अध्यक्ष होते. त्यांच्या निधनाने साहित्य विश्वात पोकळी निर्माण झाली आहे. संस्थेच्या विश्वस्त, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!!


**का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे**

**विद्यमान विश्वस्तांची यादी**

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)

मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)

मा. डॉ.के.बी. पाटील

मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी

मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन

मा. श्री. श्रीपाल मुणोत

मा. श्री. विवेक केले

मा. श्री. जितेंद्र सोनगिरे


**We accept donations from well-wishers**

K.S.Wani Memorial Trust
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

K.S. Wani Memorial Trust.
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K


**Contact:** K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org